**<u>रे.के.नं.५८/२०१९ मध्ये आरोपी संतोष अनंत दळवी यांचे जामीन अर्जावरील आदेश</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी याने जामीन मिळण्याकरीता दुस–यांदा दाखल केला आहे.

०२. त्याच्या अर्जातील कथनानुसार तो शिलोत्तर, ता. वाडा, जि. ठाणे येथील कायमचा रहिवासी आहे. तो सदर ठिकाणी त्याच्या कुटुंबियांसह राहत आहे. तो तुरुंगात राहिल्यास त्याच्या संपुर्ण कुटुंबियावर तो एकमेव कमावती व्यक्ती असल्यामुळे उपासमारीची वेळ येणार आहे. त्याने पुढे असे कथन केले आहे की, सदर प्रकरणाचा तपास पुर्ण होवून दोषारोप पत्र न्यायालयात दाखल झाले आहे. सदर दोषारोप पत्रामध्ये आरोपी बाबत कोणताही पुरावा नाही. त्याने पुढे असे कथन केले आहे की, तो फिर्यादी किंवा साक्षीदार यांना प्रभावित करणार नाही. त्याने पुढे असे कथन केले आहे की, न्यायालय ठरवतील त्या अटीप्रमाणे पुर्तता करण्यास त्यांची तयारी आहे.

०३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. यातील आरोपी याने फिर्यादी यांना जमिनीतून सोने काढून देतो असे सांगून त्याचेकडून रुपये सतरा लाख सत्त्याहत्तर हजार एवढी रक्कम लुबाडलेली आहे. इतर आरोपी अदयाप फरार आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर आरोपी जामीनावर सुटल्यास तो पळून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्य आरोपींचा शोध लागणे अशक्य होईल. त्यांनी पुढे असे कथन केले आहे

की, आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांनी अशाच प्रकारचा गुन्हा चिपळूण येथे केलेला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व लेखी म्हणणे वाचले. सरकारी वकील व आरोपीतर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील रिमांड रिपोर्ट तसेच प्रथम खबरी अहवाल याचे वाचन केले असता आरोपी यांचे विरुध्द त्यांनी दैवी शक्तीच्या जोरावर सोने काढून देतो असे सांगून फिर्यादी व त्यांचे कुटुंबियांकडून वेगवेगळी कारणे सांगून त्यांचेकडून वेळोवेळी रुपये १७,७७,०००/— घेवून त्यांना सोन्याची गणेश मुर्ती व सोन्याची बिस्कीटे असल्याचे सांगून पिवळसर धातुची मुर्ती व पिवळसर धातुचे नकली चौकन तुकडे देवून फसवणूक केली आहे.

०५. यातील आरोपीच्या वकिलांनी युक्तीवादामध्ये असे सांगितले की, आरोपीकडून कोणत्याही रकमेची जप्ती झालेली नाही. तसेच तपास पुर्ण झाला असल्याने त्यांना कोठडीमध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणाचा तपास पुर्ण होवून दोषारोप पत्र दाखल झाले आहे. या प्रकरणामध्ये आरोपी यांना कोठडीमध्ये ठेवण्यासाठी अन्य कोणतेही कारण उरलेले नाही. सरकारी वकील यांनी व्यक्त केलेली फिर्यादी व साक्षीदार यांचेवर येवू शकणा—या दबावाची शक्यता जामीन नाकारण्यास पुरेशी नाही. आरोपी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर राहत असल्याने त्याच्या रहिवासाबाबत पुरावा तसेच जामीनदाराचे बंधपत्र घेणे योग्य राहील. तथापि, प्रस्तुत प्रकरणी आरोपी हा न्यायालयाचे अधिकार क्षेत्राबाहेर वास्तव्यास असल्याने जामीनदाराचा ऐपत दाखला घेणे या प्रकरणी गुन्हयाचे स्वरुप पाहता मला आवश्यक वाटते. सबब, आरोपीचा जामीन अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

## आदेश

०१. आरोपी संतोष अनंत दळवी यांनी रुपये १५,०००/— इतक्या रकमेचा वैयक्तिक व जामीनदाराचे त्याच्या ऐपत दाखल्यासह बंधपत्र दयावे. आरोपी यांनी त्यांच्या रहिवासाच्या पत्त्याबाबतचा पुरावा म्हणून आधारकार्ड व रेशनकार्डच्या सत्यप्रती दाखल कराव्यात.

०२. आरोपी यांनी साक्षीदार यांचेवर दबाव टाकू नये.

०३. आरोपी यांनी त्यांच्या अर्जातील नमुद अटी व शर्तीचे पालन करावे.

श्रीवर्धन.　　　　( प्र. ग. लंबे )
दिनांक : ०४/११/२०१९.　　　　प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.